
तेलासाठी युद्ध

दहशतवादी नवा पवित्रा



भारत
ज्ञान विज्ञान
समुदाय

पुस्तकाचे नाव : तेलासाठी युद्ध
रूपांतर : सम्राट शिरवळकर
संपादन : विनया देशपांडे

सायन्स पब्लीकेशन्स्, चेन्नई यांच्या
'वॉर फॉर ऑईल'वर आधारित

जवाआं/६०
प्रकाशन : डिसेंबर २००३

नववाचकांसाठी भारत ज्ञान विज्ञान समितीतर्फे देशभर चालवल्या जात जात असलेल्या 'जनवाचन आंदोलन' मोहिमेसाठी प्रकाशित.

मूल्यः १५ रुपये

प्रकाशक/मुद्रक : विनया देशपांडे
जनवाचन समन्वयक, भारत ज्ञान विज्ञान समुदाय (महाराष्ट्र)
२९१,बापटवाडी,शनिवार पेठ,पुणे-४११०३०. फोन : ०२०-४४३४१३३
मुद्रण स्थळ : महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय,पुणे-४११००४

अक्षर जुळणी/मांडणीः गणेश कांबळे



जागे व्हाल, तर जगाल!

सर्व पृथ्वीवासियांनी आपल्या जीविताला असलेल्या धोक्याविषयी जागं व्हायलाच हवं. तरच आपले अस्तित्व टिकवण्यासाठी सर्व बाजूंनी संघर्ष उभा करण्याचे प्रयत्न करता येतील.

जगावर वर्चस्व गाजवू पहाणाऱ्या साम्राज्यवादी शक्ती, प्रसार माध्यमांच्या मदतीने, असा प्रचार करत आहेत की जगात शांतता राखणे आणि शस्त्रास्त्र स्पर्धेला लगाम घालणे हे महाशक्तींचेच काम आहे! ते असेही बजावत आहेत की गरीब, विकसनशील राष्ट्रांनी फक्त आपल्या देशाच्या अंतर्गत बाबींकडेच लक्ष द्यावे. या महाशक्तींचा यामागील उद्देश काय आहे? त्यांना जुन्या वसाहती व निमवसाहती देशांची लूट चालू ठेवायची आहे. विकसनशील देशातील लोकांना आजच्या महत्वाच्या प्रश्नांपासून दूर ठेवायचे आहे. हे देश समाजवादी समुदायापासून तसेच पश्चिमेतील युद्धविरोधी लोकचळवळींपासून अलग पडावेत हा त्या मागचा उद्देश आहे.

जर युद्ध सुरू झाले तर पृथ्वीवरील कोणत्याही खंडाची अथवा प्रदेशाची त्यापासून सुटका नाही!

भविष्यात आपली नजर रोखली तर काय दिसते? अणुस्फोटांची मालिका सुरू झाली तर त्याचे मनुष्य वंशावर दीर्घकाळ घातक परिणाम होतील. कर्करोगाचा भयावह फैलाव होईल. ओझोन वायूच्या आवरणावर होणाऱ्या परिणामांविषयी तर बोलायलाच नको! त्यातून प्राणी व वनस्पती यांच्या जीवनाचा विनाश होईल. हवामानात होणाऱ्या घातक बदलांमुळे मानव जातीचे जीवनच धोक्यात येईल. आणि अखिल मानवजात कायमची नामशेष होण्याचे संकट समोर उभे ठाकेल!

युद्धाची मोजलेली किंमत

पहिले महायुद्ध

मृतांची संख्या : एक कोटी

अपंग : दोन कोटी

आर्थिक खर्च : २६,००० ते

३६००० कोटी डॉलर्स



दुसरे महायुद्ध

मृतांची संख्या : पाच कोटी

अपंग : नऊ कोटी

जखमी : १ कोटी पेक्षा जास्त

युद्धाची किंमत

१९४५ पासून आजतागायत २०० युद्धे लढली गेली.

यात सुमारे ३,३०,००० ते ४,००,००० कोटी डॉलर्स इतका खर्च आला.



दुसऱ्या महायुद्धापासून झालेली युद्धे आणि शस्त्रास्त्रांवर झालेला खर्च सुमारे १०,०००,०० कोटी डॉलर्स इतका आहे!

या वर्षीच्या इराक युद्धाचा अंदाजे खर्च सुमारे १००० कोटी डॉलर्स इतका आहे.

अमेरिकेच्या पुढाकाराने जगातील सर्व युद्ध खर्चांची बेरीज ही कित्येक अब्ज डॉलर्स भरेल.

साम्राज्यवाद्यांनी केलेले गुन्हे

१९४५ ते १९४९

चीनमधील लोकक्रांती दडपण्यासाठी आणि स्वतःची पकड टिकवण्यासाठी अमेरिकेने त्या देशात घुसखोरी केली. यासाठी १,१३,००० अमेरिकी सैनिक, ६०० विमाने आणि १५० युद्धनौका एवढे बळ तैनात केले होते.

१९४६ ते १९४९

ग्रीसमधील लोकशाही क्रांती चिरडून टाकून तिथे एकतंत्री राजवट स्थापण्यासाठी अमेरिका आणि ब्रिटनने ५००० लष्करी फौज, तसेच जहाजे व २०० विमाने तिथे पाठवली.

१९४७

पॅराग्वेमध्ये जनतेचा उठाव चिरडून टाकण्यासाठी नौदलाच्या तुकड्या पाठवल्या. ''लोकशाही''ची घोषणा करत प्रत्यक्षात अमेरिकेने या देशात लष्करी हुकूमशाही प्रस्थापित केली.

१९५० ते १९५३

अमेरिकेने कुरापत काढून कोरियावर युद्ध लादले. ३,५०,००० लष्करी जवान, १००० रणगाडे, १६०० लढाऊ विमाने आणि ३०० पेक्षा जास्त युद्धनौका या युद्धात वापरल्या गेल्या. कोरियात घुसलेल्या अमेरिकी सैनिकांनी

जमिनीसह सारे काही खरवडून उध्वस्त करणाऱ्या युध्दनीतीचा अवलंब केला. यामध्ये त्यांनी नापाम बाँब, जैविक व रासायनिक अस्त्रे यासारख्या भयानक शस्त्रांचा अगणित वापर केला.

१९५४

सी.आय.ए.ने प्रशिक्षित केलेल्या भाडोत्री मारेकऱ्यांनी अमेरिकी विमानांच्या मदतीने ग्वाटेमालावर आक्रमण केले. जेकोबो अरबेन्झ् यांचे लोकशाही सरकार दूर फेकले व तिथे लष्करी हुकूमशाही प्रस्थापित केली.

१९५८

लेबनानमध्ये लोकांचा असंतोषाचा उद्रेक झाला. तो दडपून टाकण्यासाठी १४,००० नौदल व लष्करी सैनिकांच्या तुकड्या घुसल्या. त्यामागे अमेरिकेचे सहावे आरमारही उभे होते.

१९६१

क्युबाचे क्रांतिकारी सरकार उलथवण्याच्या हेतूने अमेरिकी भाडोत्री मारेकऱ्यांनी घुसखोरीचा प्रयत्न केला. यासाठी अमेरिकेत प्रशिक्षण घेतलेले १५०० हून अधिक गळेकापू, तसेच ८० युद्ध-विमाने, ३५ युद्ध-नौका क्यूबातील पपायागिरों या ठिकाणीच्या कारवाईत गुंतले होते.

१९६४

कोंगो येथील प्रगतीशील सरकार उलथून टाकण्यासाठी आणि राष्ट्रीय मुक्ती चळवळ दडपण्यासाठी, अमेरिका, ब्रिटन आणि बेल्जियम यांनी सुमारे १०,००० लष्करी जवान व ६० युद्ध-विमाने यांच्या मदतीने हस्तक्षेप केला.

१९६४

पनामा कालवा हद्दीमधील अमेरिकी लष्कर दलांनी परत जावे, लष्करी तळ काढून टाकावा आणि पनामा देशाचे सार्वभौमत्व पुनःस्थापित व्हावे अशा मागण्या करणाऱ्या पनामातील नागरिकांच्या अमेरिकी लष्करी दलाने कत्तली केल्या.

१९६४ ते १९७३

व्हिएतनामवर अमेरिकेने हल्ला केला व युद्ध पुकारले. या काळात अमेरिकेने मोठ्या प्रमाणात विमान हल्ले करुन व युद्धनौकांच्या सहाय्याने नागरी वस्त्यांवर देखील प्रचंड बॉंबवर्षाव केला. त्या राष्ट्राचे नामोनिशाण मिटवण्याच्या उद्देशाने केलेल्या या युद्धात अमेरिकेने रासायनिक शस्त्रांचा, नापाम बॉंबचा आणि अमानुष युद्धनितींचा अवलंब केला. या विनाशकारी हल्ल्याच्या परिणामी व्हिएतनामची फार मोठी हानी झाली. लोकसंख्या, अर्थकारण,

पर्यावरण, शेती सर्वांवरच या युद्धाचे भयंकर परिणाम झाले. आजदेखील या महाभयानक हल्ल्याचे दुष्परिणाम व्हिएतनामची नवी पिढी भोगत आहे.

१९६४ ते १९७३

पॅथेट लाओ मुक्ती आघाडीच्या व लोकांच्या विरोधात लाओसमध्ये हल्ला करून अमेरिकेने हे युद्ध तेथील प्रतिगामी राजसत्ता टिकवण्यासाठी केले. यात ५०,००० हून अधिक सैनिक, १,५०० युध्द-विमाने व ४० युध्दनौकाचा वापर केला.

१९६५

डोमिनिकन रिपब्लिकनी 'अमेरिकी नागरिकांचे संरक्षण' करण्याचे निमित्त करून ४०,००० अमेरिकी फौजांनी हल्ला चढवला. हे काम पार पाडणाऱ्या फौजांनी २७५ विमाने आणि ५० युद्धनौकांचा वापर केला. जनतेचा उठाव निर्दयपणे चिरडला.

१९७० ते १९७५

कंबोडियामधील प्रतिगामी 'बाहुली' सरकार टिकवण्यासाठी व त्या विरूद्धची लोकचळवळ दाबून टाकण्यासाठी अमेरिका सातत्याने आपल्या फौजा पाठवत होती. या अमेरिकी फौजांमध्ये ७०,००० लष्कर, ५०० विमाने, ७ व्या आरमाराच्या ४० युद्धनौका असा ताफा होता.

१९७१ ते १९७३

बोलिव्हिया, चिली, साल्वादोर येथे प्रतिक्रांतीकारी उठाव करून तिथे प्रतिगामी सत्ता स्थापन करण्यामध्ये सी.आय.ए.चा प्रत्यक्ष सहभाग होता. परिणामी तेथील लोकशाही सरकारांच्या जागी हुकूमशाही राजवटी आल्या.

१९८२

मध्यपूर्वेत 'शांतता' प्रस्थापित करण्याचे निमित्त करून ८०० अमेरिकी नौसैनिक लेबाननमध्ये उतरल्या. आज लेबाननमध्येच २००० अमेरिकी लष्करी अधिकारी आणि सैनिक आहेत. तेथील किनाऱ्यावर ३० अमेरिकी युद्धनौका आजही गस्त घालत आहेत. अमेरिकेच्या नौका आणि विमानांनी येथील राष्ट्रभिमानी फौजांच्या ठिकाणांवर आणि सर्वसामान्य नागरिकांवरदेखील बॉंबवर्षाव केले आहेत. या हस्तक्षेपामागचा अमेरिकेचा उद्देश एकच होता लेबाननमध्ये आपले पाय घट्ट रोवून सिरिया आणि इतर अरब राष्ट्रांवर सतत लष्करी दबाव टाकणे!

१९८३

काही कारण नसताना अमेरिकेने ग्रेनेडामध्ये लष्करी हस्तक्षेप करून तेथील लोकशाही सरकार बरखास्त केले. त्याजागी अमेरिकेचे बाहुले सरकार राज्यावर बसवले. ग्रेनेडाला अमेरिकेने अक्षरशः लष्करी तळाचे रूप दिले आहे.

१९८६

लिबिया - अमेरिकी विमानानी लिबियातील शहरांवर बॉंब वर्षाव करून हजारो सर्वसामान्य नागरिक आणि अधिकाऱ्यांचा बळी घेतला.

१९८६

हेग येथील आंतरराष्ट्रीय न्यायालयाने निकाराग्वा विरूद्ध लष्कराचा बेकायदेशीररित्या वापर केल्याबद्दल अमेरिकेचा निषेध केला!

१९८९

फिलिपाईन्समध्ये कम्युनिस्ट आणि मुस्लिम स्वातंत्र्यसैनिकांनी कोरेनझो अविनो या राष्ट्राध्यक्षांच्या काळात सरकार विरूद्ध केलेला उठाव मोडून काढण्यात अमेरिका प्रत्यक्ष सहभागी झाली.

१९८९

अमेरिकेचा पनामावर बॉंब वर्षाव!

१९९१

अमेरिकेचा वर्षानुवर्षाचा जानामाना साथीदार, सद्दाम हुसेन याने कुवेतवर हल्ला चढवला. अरब-आखातातील

तेलाच्या संपत्तीवरील ताबा सोडण्याची अमेरिकेची तयारी नव्हती. त्यामुळे १९९१ मध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवर एकजूट करून ओ.एन.यू.च्या पाठबळावर, अमेरिकेने इराकवर हल्ला चढवला व कुवेतची मुक्तता केली. एक दशकाहून अधिक काळ इराकवर व्यापारी निर्बंध लादण्यात आले.

१९९४

१९१५ ते १९३४ या कालखंडात हैती बळकावून फ्रँकोची आणि पाठोपाठ १९५१ ते १९८६ या दहशत पसरवणाऱ्या जीन क्लॉड डुवेलर हुकूमशाहाला पाठिंबा दिला. १९९१ मध्ये जनतेने निवडून दिलेले पहिले राष्ट्रपती ॲरिस्टाईड यांची सत्ता उधळून लावण्यात अमेरिकेचा हात होता. त्यात अनेक दहशतवादी सेनाधिकारी होते. नंतर तीन वर्षांनी अमेरिकेने पदच्युत केलेल्या राष्ट्राध्यक्षास, गजाआड करण्यासाठी सैनिकी बळावर हस्तक्षेप केला.

१९९८

अमेरिकेचे आणि ब्रिटनचे बॉंब हल्ले परत एकदा इराकवर आग ओकू लागले आणि जोपर्यन्त सद्दाम हुसेनची सत्ता उखडून नवीन सरकार स्थापत होत नाही तोपर्यंत हे चालूच राहील या भूमिकेवर ते ठाम राहीले.

१९९८

अतिरेक्यांना पुरविण्यासाठी युद्ध शस्त्रे आणि रसायनांची निर्मिती केली जाते या नावाखाली सुदानमधील

औषधे तयार करणाऱ्या कारखान्यांवर अमेरिकेने क्षेपणास्त्रे डागली व ते नष्ट केले.

१९९९

मार्च महिन्यात अमेरिकेच्या दबावामुळे नाटोने कोसोवो आणि सर्बियावर बाँबवर्षाव केला. वापरलेल्या युरेनियमचे शेकडो बाँब टाकून त्यांची चाचणी घेतली.

२००१

११ सप्टेंबर रोजी अमेरिकेत विमानांच्या सहाय्याने जे प्राणघातक हल्ले झाले त्याबाबतचा आरोप अमेरिकेने अल-कायदाचा प्रमुख ओसामा बिन लादेन आणि त्याच्या संघटनेवर ठेवला.लादेन हा कम्युनिस्ट-विरोधी सशस्त्र कारवायात अमेरिकेच्या गुप्तहेर खात्याचा एजंट होता. त्याला अमेरिकेचा पूर्ण पाठिंबा होता. तसेच तो करोडोपती असून तेल कंपन्यांचा भागधारक आहे!

पाकिस्तानशी हातमिळवणी करून व तिथे लष्करी तळ ठोकून अमेरिकेने अफगाणिस्तानावर भयानक हल्ले चढवले. तालिबानची इस्लामी राजवट उलथवून काळजीवाहू सरकार स्थापन केले. युद्ध कैद्यांना अमेरिकेचा तळ असलेल्या गँतेनामो येथे पाठविण्यात आले. अफगाणिस्तानी युद्धकैद्यांना आंतरराष्ट्रीय संकेतांनी मान्य केलेला अधिकृत नियम व कायदे धाब्यावर बसवून वागणूक दिली; तसेच अंतरराष्ट्रीय तत्वाला अनुसरून शिवाय हुकुमशाही पाकिस्तानी साथीदारांना कायदेशीर मान्यता देवून बळजबरीने नैसर्गिक

साधनसंपत्तीच्या त्यांनी चालवलेल्या वापराला सहमती दर्शवली.

२००२

अमेरिकेने उत्तर कोरियाला काळ्या यादीतील शत्रूराष्ट्र म्हणून जाहीर केले.

२००२

इराकमधील सद्दाम हुसेन यांची राजवट नेस्तनाबूत करून त्या ठिकाणी अमेरिकाधार्जिणे सरकार प्रस्थापित करण्यासाठी अमेरिकेने आंतरराष्ट्रीय समुदायावर युद्धखोरीला मान्यता द्यावी असा दबाव आणला. बाँबवर्षावाने उध्वस्त झालेल्या या देशांचे पुनर्वसन करून सोयिस्कररित्या तेथील बाजारपेठेत आपला पाय रोवणे आणि तेलाच्या अमाप साधनसंपत्तीवर अधिकार मिळवणे असे हेतू यामागे होते. २००२ च्या शेवटी अमेरिकेने व त्याच्या ब्रिटिश व इतर मित्र राष्ट्रांनी इराकवर सशस्त्र हल्ला चढवण्यासाठी लाखो सैनिकांचा फौजफाटा उभा केला.

२००३

अमेरिकेने आंतरराष्ट्रीय कायद्यांचे उल्लंघन करून आणि युनोचा निर्णय फेटाळून १९-२० मार्चच्या रात्री इराकवर इंग्लडच्या मदतीने हल्ला चढवला. इराकमध्ये गेल्या १० वर्षात ५,००,००० लोक केवळ आर्थिक

नाकेबंदीमुळे मृत्यूमुखी पडले, अशा देशावर पुन्हा एकदा युद्धाची आग ओकण्यास सुरूवात केली.

जागतिक पातळीवर युद्धविरोधी आणि अमेरिकी लष्करी आक्रमणाला विरोध करणारी शांतता चळवळ जोर धरते आहे. आंतरराष्ट्रीय कायद्यांचा मान राखला जावा असा आग्रह जगभरची जनता धरते आहे. जगभरातील बहुसंख्य राष्ट्रांनी, एका सार्वभौम राष्ट्रावर केलेल्या या हल्याबद्दल अमेरिकेचा निषेध केला. जी राष्ट्रे अमेरिकी साम्राज्यवादाला विरोध करतील आणि वॉशिंग्टनची मर्जी राखणार नाहीत त्यांच्यावर 'बचावात्मक युद्धा'च्या नावाखाली हल्ले चढवण्याचा घातक गुन्हेगारी पायंडा अमेरिकेने पाडला आहे. आफ्रिका आणि आखाती प्रदेश येथे अमेरिका जास्त आक्रमक होऊ लागली आहे. आपल्याला जगभरात कुठेही फौजांच्या मदतीने जलद हस्तक्षेप करता यावा यासाठी अमेरिका ठिकठिकाणी आपले लष्करी तळ आणि बालेकिल्ले तयार करत आहे.

युद्ध का घडून येते ?

इराकवरील अमेरिकेच्या १९९१च्या युद्धाची पार्श्वभूमी

⇩

अरब युद्धावर झालेला खर्च

↙ ↘

४० अब्ज अमेरिकी डॉलर्स किंवा ४२ अब्ज युरो डॉलर्स

पण हा सारा पैसा कोणी खर्च केला?

आपल्याला साहजिकच असे वाटेल की हा सारा पैसा अमेरिकेने भरला,
परंतु हे अर्धसत्य आहे. खरं तर....

४० अब्ज अमेरिकी डॉलर्स

↙ ↘

२५ % खर्च (१० अब्ज डॉलर्स) अमेरिकेने केला आहे.

७५ % खर्च (३० अब्ज डॉलर्स) हा अरब राष्ट्रांनी मुख्यतः सौदी अरेबिया आणि कुवेत यांना करावा लागला!

हा पैसा त्यांना कुठून मिळाला?

युद्धाअगोदर तेलाच्या एका पिंपाची किंमत होती फक्त १५ डॉलर्स!

आखाती युद्धानंतर ती ४२ डॉलर्स इतकी वाढली.

६० अब्ज डॉलर्स इतका **जास्तीचा नफा** यातून निर्माण झाला.

हा नफा कोणाकडे गेला?

हा नफा अरबराष्ट्रांच्या नियमाप्रमाणे अर्धा-अर्धा ('फिफ्टी-फिफ्टी') असा वाटला गेला;

५० % अरब देशांना तर, ५० % तेलाच्या गुंतवणुकीवर नियंत्रण ठेवणाऱ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांना.

युद्धासाठी कुठून पैसा आला हे यातून स्पष्ट होते.

हा पैसा त्यांना कुठून मिळाला?

तेलाच्या किंमत वाढीमुळे झालेला निव्वळ नफा

६० अब्ज डॉलर्स

३० अब्ज डॉलर्स	३० अब्ज डॉलर्स
बहुराष्ट्रीय कंपन्या	अरबी राष्ट्रांतील सरकारला (कुवेत + सौदी अरेबिया)

तेल कंपन्यांचे मालक कोण आहेत?

अरब आखातात, तेलाचा उपसा व व्यापार हा सप्त भगिनींच्या म्हणजे फक्त प्रमुख सात कंपन्यांच्या (शेल, टॅमॉइल, एस्सो...) हातात आहे. या सर्व अमेरिकन खाजगी कंपन्या आहेत. पैकी ५ अमेकिन सरकारच्या मालकीच्या आहेत!

३० अब्ज डॉलर्स पैकी

जवळपास २१ अब्ज डॉलर्स अमेरिकी सरकारकडे, तर

जवळपास ९ अब्ज डॉलर्स अमेरिकन खाजगी क्षेत्राला मिळाले.

आता थोडा हिशोब करूया....

	युद्धाचा खर्च	तेलाच्या किंमतीत वाढ झाल्यामुळे मिळालेला नफा	नफा किंवा तोटा
अरब राष्ट्रे	३० अब्ज डॉलर्स	३० अब्ज डॉलर्स	०
अमेरिकन सरकार	१० अब्ज डॉलर्स	२१ अब्ज डॉलर्स	नफा ११ अब्ज डॉलर्स
अमेरिकेतील खाजगी क्षेत्र	०	९ अब्ज डॉलर्स	नफा ९ अब्ज डॉलर्स

यावरून स्पष्ट होते की...अमेरिकेला युद्धातून २० अब्ज डॉलर्स एवढा नफा झाला आहे! थोडक्यात 'कुवेत मुक्ती' च्या नावाने प्रेतांच्या 'टाळूवरचे लोणी खाणे' हाच हेतू होता!

हे एवढ्यावरच थांबत नाही, तर....

१९९१ च्या इराक युद्धाचा खर्च सरतेशेवटी कोणावर पडला?

⇩

जे तेल वापरतात त्यांच्यावर....

⇩

....म्हणजेच तुम्ही, आम्ही...आपण सर्वजण!!!

आणि हे एवढ्यावरच थांबत नाही, तर....

अमेरिकेने या साऱ्यातून एकूण
कमावलेला नफा

↙ ↘

११ अब्ज डॉलर्स
तेलातून

४९ अब्ज डॉलर्स
शस्त्रास्त्रातून!!!

म्हणजेच त्यांच्या विक्रीतून!

हे एवढ्यावरही थांबत नाही, तर....

हे ४० अब्ज डॉलर्स कुठे गेले?

⇩

युद्ध चालू राहण्यासाठी, शस्त्रास्त्र उद्योगावर
जे बहुतांश फक्त ....

अमेरिकन आहेत!!!

आणि शेवटी हेच खरे की.....

१९९१ मधील आखाती युद्ध हे केवळ आर्थिक कारणांसाठी झाले.

''मानवी हक्क'' किंवा ''स्वातंत्र्याचा अधिकार''

यासाठी नक्कीच नाही!

आता दुसऱ्या दोन घटनांचा अर्थही आपल्याला सहज लावता येईल - एक

अफगाणिस्तानातील युद्ध आणि दुसरे, अलिकडचे इराकी युद्ध.

या दोन्ही मागची कारणे कोणती?

* अफगाणिस्तानात २५०० कि.मी. अंतराची अमेरिकी कंपनीच्या मालकीची तेल पाईपलाईन टाकण्यामध्ये कोणताही अडथळा येऊ नये यासाठी अफगाणिस्तानात अमेरिकेला आपले 'बाहुले सरकार' बसवायचे होते.

* धंद्याच्या दृष्टीने महत्वाची असलेल्या या पाईपलाईनला दुसरा पर्याय म्हणजे ५,५०० कि.मी. ची पाईपलाईन बांधणे. जिच्या बांधणीसाठी आणि देखभालीसाठी जास्त खर्च आला असता, तसेच ज्या इतर देशांच्या सीमातून ती जाईल ते देश देखील अमेरिकेवर कर लादतील. हे अमेरिकेला नको होते.

* म्हणून यापेक्षा सोपा मार्ग म्हणजे ३० वर्षे युद्धाने खिळखिळचा झालेल्या अफगाणिस्तानची धूळदाण उडवणे, आणि तेथे आपल्याला हवी असलेली कमी खर्चाची, कमी लांबीची पाईपलाईन विना अडथळा बांधून तिची देखभाल करणे; हेच अमेरिकेचे उद्दिष्ट होते व आहे.

इराकवर बुश (ज्युनिअर) यांनी परत का स्वारी केली? हे जाणण्यासाठी आपल्याला प्रथम हे माहीत पाहिजे की मध्य-पूर्वेतील तेलाचा मुख्य पुरवठादार हा सौदी अरेबिया आहे.

अमेरिका व या देशाचे बिघडलेले संबंध सुधारणे अवघड आहे.
कारण ओसामा बिन लादेनच्या अतिरेकी कारवायांमध्ये गुंतलेल्या देशांपैकी सौदी अरेबिया हा एक देश आहे, शिवाय आंतरराष्ट्रीय पातळीवरदेखील सौदी अरेबिया म्हणजे 'मानवी हक्क' पायदळी तुडवणारा देश अशी त्याची प्रतिमा आहे.

म्हणूनच बुश प्रशासनासमोरचे एक ध्येय होते:
अरब आखातात अरेबियाला पर्याय शोधणे. इतर तेल पुरवठादार शोधणे.

यासाठी सर्वात सोप्पा मार्ग म्हणजे
इराकवर युद्ध लादून तिथे अमेरिकेच्या नियंत्रणाखाली बाहुले सरकार बसवणे.

आपल्या मनात लगेच प्रश्न उभा होईल की इराकच का?

सरळ आहे, तीन कारणांसाठी :

- ❖ इराक हा असा देश आहे की जो स्वतःचा बचाव करू शकत नाही. व्यापारी निर्बंधामुळे गरीबी आहे आणि त्यामुळे दरवर्षी तेथे कुपोषणाने ३ लाख बालमृत्य होतात.
- ❖ आंतरराष्ट्रीय समुदायाला, इराककडे महासंहारक शस्त्रास्त्रे आहेत असे पटवणे फारच सोपे होते. (खरे तर इराककडे या शस्त्रास्त्र निर्मितीसाठी उच्चतंत्रज्ञान उपलब्ध नाही.)
- ❖ आत्तापर्यंत इराकला अमेरिकेच्या धमक्यांविरूद्ध उभा ठाकेल अशा दुसऱ्या कोणत्याही बलशाही राष्ट्राचा पाठिंबा लाभला नाही.

आणखी एक - व्हेनेझुएला हा देश अमेरिकेचा सर्वात मोठा तेल पुरवठादार देश आहे. पण गेल्या तीन वर्षात जीवनमान अतिशय खालावल्यामुळे व्हेनेझुएला येथे सामाजिक क्रांती झाली. यामुळे बुश सरकारला सौदी अरब व व्हेनेझुएला या राष्ट्रांव्यतिरिक्त पर्याय शोधणे गरजेचे ठरेल.



इराक युध्दाचे समर्थन करण्यापूर्वी आपण या माहितीचा विचार केला आहे का?

- **जगाच्या लोकसंख्येपैकी किती टक्के लोक अमेरिकेत राहतात?**

: ६ टक्के

- **जगातल्या एकूण साधनसंपत्तीपैकी अमेरिकेत किती साधनसंपत्ती आहे?**

: ५० टक्के

- **कोणत्या देशात जगातला सगळ्यात मोठा तेलसाठा आहे?**

: सौदी अरेबिया

- **दुसऱ्या क्रमांकाचा तेल साठा असलेला देश कोणता?**

: इराक

- **जगामध्ये दरवर्षी किती लष्करी खर्च होतो?**

: ९०० अब्ज डॉलर्स पेक्षा जास्त.

- **यातील अमेरिकेने केलेल्या खर्चाचा वाटा किती?**

: ५० टक्के

♦ **अमेरिका करीत असलेल्या लष्करी खर्चापैकी किती टक्के खर्च हा जगातील सर्व माणसांना जीवनावश्यक गोष्टींचा पुरवठा करू शकतो असे संयुक्त राष्ट्र संघाचे म्हणणे आहे?**

: १० टक्के (म्हणजे जवळजवळ ४० ते ४५ अब्ज डॉलर्स, म्हणजेच अफगाण युद्धावर केलेला खर्च)

♦ **दुसऱ्या महायुद्धानंतर आजतागायत झालेल्या युद्धांमध्ये किती लोक मृत्युमुखी पडलेले आहेत?**

: ८ कोटी ६० लाख.

♦ **इराककडे रासायनिक आणि जैविक अस्त्रे कधीपासून आहेत?**

: साधारण १९८० पासून.

♦ **इराकने ही शस्त्रास्त्रे स्वतः बनवली आहेत का?**

: नाही! यासाठी लागणारे साहित्य आणि तंत्रज्ञान अमेरिकेने, ब्रिटनने व इतर खाजगी मक्तेदार कंपन्यांनी पुरवले आहे.

♦ **इराकने इराणविरूद्ध केलेल्या विषारी वायूंच्या वापराला अमेरिकेने कधी विरोध केला का?**

: नाही.

♦ **अमेरिकेने व्हिएतनाम विरोधी युद्धात किती गॅलन 'एजंट ऑरेंज' हे घातक रसायन वापरले?**

: १ कोटी ७० लाख गॅलन.

- ११ सप्टेंबरचा अमेरिकेतील दहशतवादी हल्ला आणि इराक यांचा संबंध दाखवणारे काही पुरावे आहेत का?
  : नाही.
- गेल्या आखाती युद्धात मृत्यूमुखी पडलेल्या सर्वसामान्य नागरिकांची संख्या किती?
  : ३५०००.
- गेल्या आखाती युध्दात इराकच्या लष्कराकडून, पश्चिमात्य देशांचे लष्करी हल्ल्यात किती सैनिक मारले गेले?
  : शून्य.
- रणगाड्यांना पुढे फाळ लावून माघार घेतलेल्या किती इराकी सैनिकांना अमेरिकेने वाळूत जीवंत गाडले?
  : ६०००.
- आखाती युद्धानंतर इराक आणि कुवेतमध्ये किती टन घातक 'डिप्लीटेड् युरेनिअम्' टाकून देण्यात आले?
  : ४० टन.
- संयुक्त राष्ट्र संघाच्या माहितीनुसार इराकमध्ये १९९१ ते १९९४ च्या दरम्यान कॅन्सरच्या प्रमाणात किती वाढ झाली?
  : ७०० टक्के.
- १९९१ मध्ये इराकची किती लष्करी क्षमता नष्ट केली असा अमेरिकेचा दावा होता?
  : ८० टक्के.

♦ स्वसंरक्षणार्थ आणि शत्रूला रोखणे या व्यतिरिक्त इराक आपल्या शस्त्रांचा वेगळा वापर करणार असल्याचा कुठला पुरावा उपलब्ध आहे का?

: नाही.

♦ दहा वर्षापूर्वी जागतिक शांततेला इराककडून जेवढा धोका होता तो आता वाढला आहे का?

: नाही.

♦ २००२ - २००३ मध्ये झालेल्या इराकयुद्धा दरम्यान पेंटागॉन या अमेरिकी लष्करी मुख्यालयाने किती नागरिकांचा मृत्यू होईल याचा अंदाज वर्तवला होता काय?

: १०,०००.

♦ यात लहान मुलांचे प्रमाण किती?

: ५० टक्के.

♦ अमेरिका इराकवर किती वर्षे हवाई बॉम्ब हल्ले करत आहे?

: ११ वर्षे.

♦ डिसेंबर १९९८ ते सप्टेंबर १९९९ या काळात अमेरिका व इंग्लंड यांनी इराकविरूद्ध रीतसर युद्ध पुकारले होते काय?

: नाही.

◆ तरीही डिसेंबर १९९८ ते सप्टेंबर १९९९ मध्ये त्यांनी इराकवर किती पौंड स्फोटकांचा मारा केला?

: २ कोटी पौंड. (सुमारे ९० लाख किलो.)

◆ इराकवर आयात व निर्यात निर्बंध लादणारा संयुक्त राष्ट्र संघाचा ठराव किती वर्षांपूर्वी संमत झाला?

: १२ वर्षांपूर्वी.

◆ १९८९ मध्ये इराकमध्ये बालमृत्यूंचे प्रमाण (दर हजारी) किती होते?

: ३८. (१००० मागे)

◆ १९९९ च्या अंदाजानुसार हे प्रमाण किती आहे?

: १३१. (म्हणजे ३४५ टक्क्यांनी वाढ)

◆ संयुक्त राष्ट्रसंघाच्या निर्बंधांमुळे इराकमध्ये ऑक्टोबर १९९९ पर्यंत किती इराकी नागरिक मृत्यूमुखी पडले?

: १५ लाख.

◆ संयुक्त राष्ट्र संघाच्या निर्बंधामुळे इराकमध्ये १९९७ नंतर किती बालमृत्यू झाले असावेत?

: ७ लाख, ५० हजार.

◆ सद्दामने शस्त्रास्त्र निरीक्षकांना (तपासनीसांना) इराकमधून बाहेर हाकलले का?

: नाही.

◆ नोव्हेंबर व डिसेंबर १९९८ मध्ये इराकमध्ये किती वेळा तपासण्या झाल्या?

: ३००.

◆ यातल्या किती तपासण्याबाबत अडचणी निर्माण झाल्या?

: ५.

◆ 'बाथपार्टी'च्या मुख्य कार्यालयात शस्त्रास्त्र तपासनीसांना प्रवेश दिला गेला की नाही?

: हो.

◆ 'डिसेंबर १९९८ पर्यंत इराकमध्ये आधुनिक इतिहासात अभूतपूर्व असे निःशस्त्रीकरण झाले, असे कोण म्हणाले?

: स्कॉट रिटर्, UNSCOM प्रमुख

◆ १९९१ नंतर १९९८ पर्यंत, इराकची महा संहारक शस्त्रास्त्रे निर्माण करण्याची किती क्षमता संयुक्त राष्ट्रसंघाच्या तपासनीसांनी शोधली आणि निकामी केली?

: ९० टक्के

◆ इराक परत एकदा निरीक्षकांना तपासणी करू देण्यास तयार आहे का?

: हो.

◆ **इस्त्राईलने १९९२ नंतर संयुक्त राष्ट्रसंघाच्या किती ठरावांची पायमल्ली केली?**

: ६५ च्या वर

◆ **जगात किती देशांकडे अण्वस्त्रे आहेत?**

: ८.

◆ **अमेरिकेकडे किती अण्वस्त्रे आहेत?**

: १०,००० च्या वर

◆ **असा कोणता देश आहे ज्याने अण्वस्त्रांचा वापर केला आहे?**

: अमेरिका

◆ **इस्त्राईलकडे किती अण्वस्त्रे आहेत?**

: ४०० च्या वर.

◆ **'ज्या गोष्टींचा आपल्यावर परिणाम होत असूनही त्याबाबत आपण मौन राखू लागतो त्या दिवशी आपला शेवट जवळ आला असे समजावे' असे कोणी म्हटले आहे?**

: डॉ.मार्टिन ल्यूथर किंग (ज्युनिअर)

जर महायुद्ध झालेच तर आजही कशीबशी तग धरून बसलेल्या विकसनशील (गरीब) राष्ट्रांवर काय परिणाम होईल?



आण्विक युद्धामुळे निर्माण झालेल्या तणावांतून जरी काही विकसनशील देश तगून राहिले तरी ते इतके मागे फेकले जातील की त्यामुळे या देशांना वसाहती म्हणून शेकडो वर्षे अनुभवलेल्या दुष्परिणांमापेक्षा भयावह परिस्थितीला तोंड द्यावे लागेल.



सर्वनाशी युद्धाला रोखणे यापेक्षा दुसरी कोणतीही महत्वाची जबाबदारी आज मानव जाती समोर नाही.

तिसऱ्या जगातील बहुतेक गरीब राष्ट्रांवर आज अमेरिकेने अण्वस्त्रे रोखलेली असल्यामुळे हे काम आणखीनच महत्वाचे व तातडीचे बनले आहे.

प्रश्न अनेक आहेत ......
परंतु सगळ्याचे उत्तर एकच आहे.

(१) जगात असा कोणता देश आहे ज्याने २० हून अधिक देशांवर १९४५ पासून बाँबहल्ले केले आहेत?

(२) अण्वस्त्रांचा वापर करणारा एकमेव देश कोणता?

(३) बैरूत येथे १९८५ साली क्रूर 'कारबॉंब'चा वापर ज्यामध्ये झाला; त्यामध्ये ८० नागरिक निदर्यपणे मारले गेले आणि त्याचा मध्यपूर्वेच्या आधुनिक इतिहासात 'सर्वात भयावह हल्ला' असा उल्लेख होतो. अशा हल्ल्यास जबाबदार देश कोणता?

(४) १९८६ मध्ये लिबियावर कोणत्या देशाने बेकायदेशीर बाँबहल्ला केला, ज्याचा उल्लेख संयुक्त राष्ट्र संघाच्या कायदा समितीने दहशतवादाचा 'अभिजात नमुना' असा केला?

(५) १९८६ मध्ये निकाराग्वाविरूद्ध चढवलेला हल्ल्या संदर्भात 'बेकायदेशीर बळाचा वापर' थांबवा असा आंतरराष्ट्रीय न्यायालयाने दिलेला आदेश कोणी धुडकावला? आणि 'सर्व राष्ट्रांनी आंतरराष्ट्रीय कायद्याचे

पालन करावे' अशा सुरक्षा समितीत आलेल्या ठरावावर ज्याने नकाराधिकार वापरला असा देश कोणता?

(६) १९८० नंतरच्या काळात ग्वाटेमाला येथील मायम जमातीचा वंशसंहार करण्याच्या कृतींना 'प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष' पाठिंबा दिल्याबद्दल संयुक्त राष्ट्रसंघाच्या सत्यशोधक समितीने कोणत्या राष्ट्रास दोषी ठरवले?

(७) लक्ष्यवेधी क्षेपणास्त्र (बॅलिस्टिक मिसाईल) विरोधी करारातून २००१ साली कोणत्या देशाने एकतर्फी अंग काढून घेतले?

(८) जैविकशस्त्रांच्या तपासणी संबंधीच्या प्रक्रियेत अडथळा आणून, त्याबाबतची जुलै २००१ साली होणारी आंतरराष्ट्रीय परिषद थांबवणारा देश कोणता?

(९) २००१ सालच्या छोट्या शस्त्रास्त्रांसंबंधी परिषदेत, बंदुकींच्या व्यापारावर निर्बंध लादण्यापासून संयुक्त राष्ट्र संघाला रोखणारा देश कोणता?

(१०) बालकांच्या हक्कात सुधारणा संयुक्त राष्ट्रसंघाच्या करणाऱ्या करारास नकार देणारा सोमालिया व्यतिरिक्त दुसरा देश कोणता?

(११) बालकांना मृत्यूदंड देणारा एकमेव पाश्चात्य देश कोणता?

(१२) १९९७मध्ये भूसुरूंगावर बंदी घालणाऱ्या करारावर सही करण्यास नकार देणारा सात बड्या राष्ट्रांपैकी (जी-७ राष्ट्रांपैकी) एकमेव देश कोणता?

(१३) आंतराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालय स्थापन करण्याविरूद्ध १९९८ मध्ये मतदान करणारा जी-७ मधला एकमात्र देश कोणता?

(१४) १९८७ च्या संयुक्त राष्ट्रांच्या सर्वसाधारण सभेच्या आंतरराष्ट्रीय दहशतवादाचा निषेध करणाऱ्या, ठरावास विरोध करणारा, इस्त्राईल व्यतिरिक्त दुसरा देश कोणता?

(१५) संयुक्त राष्ट्रसंघास देऊ लागत असलेली रक्कम नाकारणारा पण तरीही संयुक्त राष्ट्र संघाच्या ठरावांविरोधी नकाराधिकारचा हक्क बाळगणारा देश कोणता?

या प्रश्नांचे उत्तर तुम्ही ओळखलेच असेल, ते म्हणजे -

'अ मे रि का'

एक कळकळीचे आवाहनः

दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका हा जागतिक शांततेचा मारेकरी देश ठरला आहे. स्वतःला जागतिक पोलिस मानून या देशाने जागतिक पातळीवर बऱ्याच ठिकाणी साध्या किंवा गुंतागुंतीच्या वादांमध्ये नाक खुपसले आहे. या वादांचा, कोणताही परिणाम अमेरिकेवर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे झालेला नसताना! सरळ सोप्या गोष्टी अवघड करणे, अवघड गोष्टी आणखी क्लिष्ट बनवून जगावर राज्य गाजवण्याचा आपला छुपा कार्यक्रम या देशाने यशस्वीरित्या पुढे सरसावला आहे.

हे अनेक उदाहरणांमधून दिसून येते. अमेरिकेने आपल्या डावपेचांचा वापर करून विविध जागतिक संघटना व देशांवर दबाव आणून जागतिक शांतता व एकात्मतेचे पारडे आपल्या सोयीनुसार, मर्जीनुसार व इच्छेनुसार वाकवले आहे. वर्ल्ड ट्रेड सेंटरवरील हल्ल्यानंतर या देशाने जगापुढे 'एक तर आमच्या बरोबर किंवा दहशतवाद्यांबरोबर' अशी घोषणा ठेवली. याचा अर्थ मनुष्यजातीवर दुष्परिणाम करणाऱ्या अमेरिकेच्या

धोरणांना जे विरोध करतील त्यांच्यावर 'दहशतवादी' असा शिक्का मारला जाईल. अन्यथा दुसरा पर्याय म्हणजे अमेरिकेबरोबर सामील व्हा. आपल्या यंत्रणांचा वापर करून अमेरिकेने किल्येक ठिकाणी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे दहशतवादी कारवायांना पाठिंबा दिला आहे. या मागचा हेतू उघडपणे स्वतःचे स्वार्थी हितसंबंध जोपासणे एवढाच आहे. खरेतर स्वतःचे हात रक्ताने बरबटलेले असताना ते दहशतवादाबाबत हात कसे झटकू शकतात? जागतिक शांततेला धोका पोचवणारा असा हा क्रूर खेळ अलिकडच्या काळात अमेरिकेने सातत्याने खेळला आहे.

या यादीत अगदी ताजे उदाहरण म्हणजे इराक आहे. यानंतर ही यादी वाढण्याची शक्यता आहे. क्यूबा, पॅलेस्टाईन, लिबिया आणि दक्षिण कोरिया या इथे थेट हस्तक्षेप करण्याचे धोरण सध्या 'बाजूला' ठेवले आहे. सध्या इराकवर हल्ला करून आपल्याला जास्तीत जास्त किती विरोध होतो याचा अंदाज घेण्याचा डाव अमेरिका खेळत आहे. इराकनंतर मग हळूहळू इतरांकडे मोर्चा वळवण्याचे अमेरिकेचे उद्दिष्ट आहे.

संयुक्त राष्ट्र संघाचादेखील एखाद्या बुजगावण्याप्रमाणे वापर केला जात आहे. जागतिक पातळीवरील युद्धबंदीसाठीच्या सर्व विनंत्या धुडकावून लावल्या जात आहेत.

हे सर्व कसे थांबले? हजारो निरपराध तान्ह्या बालकांच्या, मुलांच्या, बायकांच्या कत्तली झाल्यानंतर? एखाद्या संपूर्ण देशाचा विकास खुंटवून, त्या देशाला बॉंबवर्षावाने ३०-४० वर्षे विकासाच्या पातळीवर पुन्हा मागे ढकलून? त्या देशाची सुपीक माती नापिक बनवून आणि पर्यावरण उजाड करून? आपल्याला प्रत्युत्तर द्यायला उशीर झाला आहे! असे रानटी हल्ले तावडतोब रोखले पाहिजेत. जगातून युद्धविरोधी हुंकार येतो आहे. शांततेच्या आक्रंदनाने सर्व जग शोकाकूल झाले आहे.

जगातील शांतता प्रेमींनो एक व्हा!.....कृपा करून एक व्हा......

काही आकडेवारी

दक्षिण अशियातील देशांचा सन १९९६ मधील संरक्षणावरचा खर्च	
भारत	१०१५.८ कोटी डॉलर्स
पाकिस्तान	३५७.९ कोटी डॉलर्स
बांगला देश	५१.७ कोटी डॉलर्स
श्रीलंका	८६.७ कोटी डॉलर्स
नेपाळ	३.९ कोटी डॉलर्स
मालदिव	-
भूतान	
संदर्भ: ह्यूमन डेव्हलपमेंट रिपोर्ट १९९८	

भारताची आणि पाकिस्तानची संरक्षण तरतूद : एक दृष्टिक्षेप
• २००१ मध्ये संरक्षणासाठी पाकिस्तानने केलेली तरतूद ही १९९९ मध्ये त्यांनी केलेल्या तरतूदीपेक्षा कमी होती. तर भारताने २००१ मध्ये केलेली संरक्षणावरची तरतूद ही १९९९ मध्ये केलेल्या तरतूदीपेक्षा ३० टक्के एवढी जास्त होती.
• १९९९-२००० मध्ये भारताची संरक्षण तरतूद ४५,६९४ कोटी रु. तर २००१-०२ मध्ये ही तरतूद ६२,००० कोटी रुपये झाली. म्हणजे भारताची संरक्षण तरतूद या एका वर्षात १६,३०६ कोटी रु.ने वाढली.
• १९९९-२००० मध्ये पाकिस्तानची संरक्षण तरतूद १३,३६४ कोटी रुपये तर २००१-०२ मध्ये ही तरतूद १३,१६० कोटी रु. होती. म्हणजे पाकिस्तानने या एका वर्षात २०० कोटी रुपयांनी संरक्षण तरतूद कमी केली.

भारत, जग आणि विकसनशील देश : एक तुलना		भारत	जग	विकसन-शील देश
१	५ वर्षाखालील मृत्युदर (१९९९)	९८	८२	९०
२	नवजात अर्भकांचा मृत्युदर (१९९९)	७०	५७	६३
३	सरासरी आयुष्य मर्यादा	६३ वर्षे	६४ वर्षे	६३ वर्षे
४	जन्माच्या वेळी वजन कमी भरणाऱ्या अर्भकांची टक्केवारी	३३ %	१६ %	१७ %
५	५ वर्षाखालील कमी वजन असणाऱ्या मुला-मुलींची टक्केवारी	५३ %	२८ %	२९ %
६	सांडपाण्याच्या व्यवस्थेचा फायदा मिळणारी लोकसंख्या टक्केवारीमध्ये	३१ %	५७ %	५२ %
७	कांजण्यांची लस टोचलेल्या एक वर्षापर्यंतच्या मुला-मुलींनी टक्केवारी	५५ %	७२ %	७० %
८	दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्या	४४ %	२४ %	२६ %
९	एक लाख जन्मामागे माता मृत्यूंचे प्रमाण (१९९०)	५७०	४३०	४८८
१०	प्रशिक्षित दायीकडून होणाऱ्या बाळंतपणाची टक्केवारी	३४ %	५६ %	५२ %
११	एक लाख लोकसंख्येमागे क्षय रुग्ण (१९९५)	१३०.८	५९.७	६८.६
१२	दर लाख लोकसंख्येमागे डॉक्टरांची संख्या (१९९३)	४८	१२२	७६
१३	राष्ट्रीय ढोबळ उत्पनांच्या प्रमाणात सार्वजनिक आरोग्यावरील खर्च	०.७ %	३.२ %	२.७*
१४	प्रौढांमधील साक्षरतेचे प्रमाण	५८ %	७७ %	७४ %
१५	प्रौढ स्त्रियांमधील साक्षरतेचे प्रमाण	४४ %	६९ %	६६ %
१६	५ वी पर्यंत शिक्षण पूर्ण करणाऱ्यांची टक्केवारी	५२ %	७५ %	७३ %
१७	राष्ट्रीय ढोबळ उत्पनाच्या (जी.एन.पी.) च्या प्रमाणात सार्वजनिक शिक्षणावरचा खर्च (१९९५)	३.५ %	४.९ %	३.८ %
१८	संरक्षणावर केंद्र सरकारने केलेली खर्चाची तरतूद	१६ %	९ %	११ %

ही आकडेवारी ह्यूमन डेव्हलपमेंट रिपोर्ट १९९८, स्टेट ऑफ वर्ल्डस चिल्ड्रन २००१, आणि वर्ल्ड डेव्हलपमेंट रिपोर्ट १९९८-९९ यावरून घेतली आहे.

* आर्थिक दृष्ट्या मध्यम व गरीब अशा गटातील देश

"....जग हे तेव्हाच चांगले, सुंदर होईल जेव्हा, हे घातक बाँब ज्यांनी तयार केले आहेत ते स्वतःच त्याचा नाश करतील."

सी.व्ही.रामन, ३० डिसेंबर १९३५





"....अणुऊर्जा आणि तिचे सामाजिक परिणाम याविषयी नागरिकांमध्ये एक समज तयार करण्याविषयी आम्हा शास्त्रज्ञांवर असलेल्या अटळ जबाबदारीची जाणीव आम्हाला आहे. आमचा विश्वास आहे की जागृत नागरिक हे जीवनासाठी कृतिशील बनतील, मृत्यूसाठी नाही. यातच आपली सुरक्षितता आणि उद्याची आशा सामावलेली आहे."

• अल्बर्ट आईनस्टाईन, २२ जानेवारी १९४७

